# नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका स्थायी समिती नांदेड.

बुधवार, दि. २३.१२.२०१५ रोजी दुपारी ०३.०० वाजता नांवामनपा स्थायी समितीची सभा मनपाकेच्या मुख्य कार्यालयाचे प्रशासकिय इमारतीतील पहिल्या माळयावरील समिती सभागृहात मध्ये भरविण्यात आली होती. उपस्थिती नोंदणी रजिस्टर मध्ये स्वाक्षरी करुन सदर सभेस खालील म.न.पा. स्थाई समितीचे सदस्य उपस्थित होते.

**सौ. अनुजा अमितसिंह तेहरा, सभापती**

सर्वश्री

| | |
|---|---|
| मोरे संजय गंगाधर | अन्नेवार गंगासागर संदिप |
| प्रविण बालाप्रसाद बियाणी | विनयकुमार जगदिश गुर्रम |
| संगिता पृथ्वीराज राओत्रे | ज्योती महेंद्र खेडकर |
| सलिमा बेगम नुरुल्ला खान | शर्मा पुष्पाताई राजेश |
| कदम गंगाबाई नारायण | चव्हाण उमेसिंह अशोकसिंह |
| फारुख हुसेन कासीम साब | जकीया बेगम स. मुखतार |

**सभापती** सर्व प्रथम उपस्थित सर्व स.सदस्य, श्री सुशिल खोडवेकर आयुक्त, श्री प्रकाश येवले, उपआयुक्त, प्र.उपआयुक्त श्री विजयकुमार मुंडे, श्री आर.एस.कोलगणे मुख्य लेखा परिक्षक, डॉ. आसिफ प्र. मुख्य वैद्यकिय अधिकारी, श्री म.सादीक मुख्य लेखाधिकारी, श्री गिरीष कदम कार्यकारी अभियंता, व सर्व क्षेत्रिय अधिकारी व विभाग प्रमूख यांचे स्वागत करुन आजच्या सभेच्या कामकाजास सुरवात करण्यात येते.

**विषय क्रं.१**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका पुर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण महिला व बाल कल्याण समिती ने ठराव क्रं. २ दिनांक २०.०५.२०१५ अन्वये नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या शाळेतील वर्ग ५वी ते १०वी च्या विद्यार्थ्यांना सालसन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षात दप्तराचे वाटप करण्यासाठी रुपये ३,००,०००/- (अक्षरी रुपये ति लक्ष फक्त) प्रशासकिय व आर्थीक मंजुरी प्रदान करण्यात आली असून अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकातील सालसन २०१५-१६ मध्ये महिला व बालकल्याण विकासासाठी रुपये ३,००,०००/- (अक्षरी रुपये तीन लक्ष फक्त ची तरतुद ठेवण्यात आली आहे त्या तरतुदी मधून वर्ग १ली ते ४थी च्या विद्यार्थीनीचे दप्तर खरेदी करण्यासाठी रुपये १,७२,२७०/- चा खर्च करण्यात आला असता सदरचे लेखा शिर्षात केवळ रुपये १,२७,७३०/- एवढी तरतुद शिल्लक राहते आणि वर्ग ५वी ते १०वी च्या विद्यार्थीनीसाठी दप्तर खरेदी करण्याकरिता रुपये १,९१,०४०/- (अक्षरी रुपये एक लक्ष एक्यान्नव हजार चाळीस फक्त) एवढा लागणारा खर्च जो उक्त शिल्लक तरतुदी पेक्षा जास्त होत असल्याने अंदाजपत्रकातील महिला व बालकल्याण अंतर्गत शालेय विद्यार्थ्यांसाठी गणवेश खरेदी या लेखा शिर्षातून जास्तीचे रक्कम रुपये ६३,३१०/- वळती करावी लागणार आहे. करिता सालसन २०१५-१६ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकातील महिला व बालकल्याण विकासासाठी या लेखाशिर्षात ठेवण्यात आलेली रक्कम अपुरी पडत असल्यामुळे, महिला व बालकल्याण अंतर्गत शालेय विद्यार्थ्यांसाठी गणवेश खरेदी या लेखाशिर्षातील रक्कमेतून रुपये ६३,३१०/- (अक्षरी रुपये त्रेसष्ट हजार तीनशे दहा फक्त) महिला व बालकल्याण विकासासाठी या शिर्षामध्ये पुनर्विनियोजन करण्याचे मंजुरीसाठी सदरचा प्रस्ताव स्थायी समिती समोर सादर.

**प्रशासकिय टिप्पणी**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका पुर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण महिला व बाल कल्याण समिती ने ठराव क्रं. २ दिनांक २०.०५.२०१५ अन्वये नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या शाळेतील वर्ग ५वी ते १०वी च्या विद्यार्थ्यांना सालसन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षात दप्तराचे वाटप करण्यासाठी रुपये ३,००,०००/- (अक्षरी रुपये ति लक्ष फक्त) प्रशासकिय व आर्थीक मंजुरी प्रदान करण्यात आली असून अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकातील सालसन २०१५-१६ मध्ये महिला व बालकल्याण विकासासाठी रुपये ३,००,०००/- (अक्षरी रुपये तीन लक्ष फक्त ची तरतुद ठेवण्यात आली आहे त्या तरतुदी मधून वर्ग १ली ते ४थी च्या विद्यार्थीनीचे दप्तर खरेदी करण्यासाठी रुपये १,७२,२७०/- चा खर्च करण्यात आला असता सदरचे लेखा शिर्षात केवळ रुपये १,२७,७३०/- एवढी तरतुद शिल्लक राहते आणि वर्ग ५वी ते १०वी च्या विद्यार्थीनीसाठी दप्तर खरेदी करण्याकरिता रुपये १,९१,०४०/- (अक्षरी रुपये एक लक्ष एक्यान्नव हजार चाळीस फक्त) एवढा लागणारा खर्च जो उक्त शिल्लक तरतुदी पेक्षा जास्त होत असल्याने अंदाजपत्रकातील महिला व बालकल्याण अंतर्गत शालेय विद्यार्थ्यांसाठी गणवेश खरेदी या लेखा शिर्षातून जास्तीचे रक्कम रुपये ६३,३१०/- वळती करावी लागणार आहे.करिता सालसन २०१५-१६ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकातील महिला व बालकल्याण विकासासाठी या लेखाशिर्षात ठेवण्यात आलेली रक्कम अपुरी पडत असल्यामुळे, महिला व बालकल्याण अंतर्गत शालेय विद्यार्थ्यांसाठी गणवेश खरेदी या लेखाशिर्षातील रक्कमेतून रुपये ६३,३१०/- (अक्षरी रुपये त्रेसष्ट हजार तीनशे दहा फक्त) महिला व बालकल्याण विकासासाठी या शिर्षामध्ये पुनर्विनियोजन करण्याचे मंजुरी देणे आवश्यक आहे.

**सभापती** आयुक्तांनी सादर केलेल्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं. १८४** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका पुर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण महिला व बाल कल्याण समिती ने ठराव क्रं. २ दिनांक २०.०५.२०१५ अन्वये नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या शाळेतील वर्ग ५वी ते १०वी च्या विद्यार्थ्यांना सालसन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षात दप्तराचे वाटप करण्यासाठी रुपये ३,००,०००/- (अक्षरी रुपये ति लक्ष फक्त) प्रशासकिय व आर्थीक मंजुरी प्रदान करण्यात आली असून अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकातील सालसन २०१५-१६ मध्ये महिला व बालकल्याण विकासासाठी रुपये ३,००,०००/- (अक्षरी रुपये तीन लक्ष फक्त ची तरतुद ठेवण्यात आली आहे त्या तरतुदी मधून वर्ग १ली ते ४थी च्या विद्यार्थीनीचे दप्तर खरेदी करण्यासाठी रुपये १,७२,२७०/- चा खर्च

करण्यात आला असता सदरचे लेखा शिर्षात केवळ रुपये १,२७,७३०/- एवढी तरतुद शिल्लक राहते आणि वर्ग ५वी ते १०वी च्या विद्यार्थीनीसाठी दप्तर खरेदी करण्याकरिता रुपये १,९१,०४०/- (अक्षरी रुपये एक लक्ष एक्यान्नव हजार चाळीस फक्त) एवढा लागणारा खर्च जो उक्त शिल्लक तरतुदी पेक्षा जास्त होत असल्याने अंदाजपत्रकातील महिला व बालकल्याण अंतर्गत शालेय विद्यार्थ्यांसाठी गणवेश खरेदी या लेखा शिर्षातून जास्तीचे रक्कम रुपये ६३,३१०/- वळती करावी लागणार आहे. करिता सालसन २०१५-१६ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकातील महिला व बालकल्याण विकासासाठी या लेखाशिर्षात ठेवण्यात आलेली रक्कम अपुरी पडत असल्यामुळे, महिला व बालकल्याण अंतर्गत शालेय विद्यार्थ्यांसाठी गणवेश खरेदी या लेखाशिर्षातील रक्कमेतून रुपये ६३,३१०/- (अक्षरी रुपये त्रेसष्ट हजार तीनशे दहा फक्त) महिला व बालकल्याण विकासासाठी या शिर्षामध्ये पुनर्विनियोजन करण्यास हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो

**विषय क्रं.२**

केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत अभियान (नागरी) च्या धर्तीवर राज्यामध्ये स्वच्छ महाराष्ट्र (नागरी) हे एक अभियान म्हणुन राबविण्यास शासन निर्णय, नगरविकास विभाग, क्रं. स्वभाअ/२०१५/प्र.क्र.२३/नवि-३४, दिनांक १५ मे २०१५ अन्वये मान्यता देऊन शासनाने, शासन परिपत्रक क्रं. राअसं/कार्यान्वयन सुचना/४२/१५१६, दिनांक २८ जुलै २०१५ अन्वये, राज्यातील शहरामधील उघडयावर शौच करण्याचे प्रथा बंद करुन शहर हे हंगदारी मुक्त करण्या संदर्भात कार्यान्वयन सुचना दिल्या आहेत. या अंतर्गत स्वच्छ महाराष्ट्र अभियानाच्या अमलबजावणीसाठी स्वतंत्र कक्ष स्थापन करुन, अमलबजावणी कक्षामार्फत सर्वेक्षण, माहीतीचे संकलन, कृती आराखडया तयार करणे. जनजागृती, अर्ज मागविणे, स्थळ निरीक्षण, अर्ज मंजुरी, शौचालय बांधकामाचे नमुने, पर्यवेक्षण पुर्णत्व अहवाल, संकेत स्थळावर माहिती भरणे, व प्रगती अहवाल पाठविणे इत्यादी कार्यवाहीचे टप्पे नमुद केले आहेत. वरील शासन परिपत्रकानुसार, महानगरपालिका नांदेडने महापालिका क्षेत्रातील सर्वेक्षणाचे काम दिनांक ०८.०८.२०१५ रोजी हाती घेवुन, त्या अंतर्गत एकूण ४२०४ लाभार्थ्यांचे विहीत जोडपत्राअन्वये माहितीचे संकलन करण्यात आले या नंतर क्षेत्रीय कार्यालय निहाय वसुली लिपीक यांच्या मार्फत जोडपत्र-२ तसेच तांत्रीक कर्मचारी यांचे मार्फत स्थळ निरीक्षण करण्यात येऊन पात्र व अपात्र लाभार्थ्यांची यादी तयार करण्यात आली आहे. प्रभागनिहाय एकूण पात्र लाभार्थ्यांची यादी अवलोकनार्थ सादर.

शासनाने वैयक्तीक शौचालय बांधकामासाठी केंद्र व राज्य शासनाच्या हिश्याचा निधीचा पहीला हप्ता रुपये २६६.१३ लक्ष महापालिकेस वितरीत केला असुन सन २०११ च्या जनगणने नुसार शौचालयाचे सुविधा उपलब्ध नसल्याने उघडयावर शौचास जाणा-या कुटूंबाची संख्या १२,०७३ आहे. यानुसार पहिला टप्पात २१९५ वैयक्तीक शौचालय बांधकामाचे उदिष्ट आहे.

राज्य स्तरावर वर्षनिहाय असलेल्या वैयक्तीक शौचालयाचा अनुशेष भरुन काढण्याच्या दृष्टीने तातडीचे धोरण ठरवीने गरजेचे असल्यामुळे केंद्र शासनाच्या शहरी विकास मंत्रालय संयुक्त सचीव एंव मिशन निदेशक (S.B.M) मा. श्री प्रवीण प्रकाश यांनी अर्ध शासकीय पत्र क्रं. १२/४०/२०१५ S.B.M दिनांक १७ नोव्हेंबर २०१५ अन्वये नोंदणीकृत व पात्र कंत्राटदारांना एकदाच रु. ३०.०० लक्ष पर्यंत १५० वैयक्तीक शौचालयाचे बांधकाम सम समान व रास्त पध्दतीने वाटप करुन जलद गतीने काम पुर्ण करण्याचे निर्देश दिले आहेत. महापालिका क्षेत्रातील एकूण (२४७५) पात्र वैयक्तीक शौचालयाचे बांधकाम व यापुढील पात्र होणा-या वैयक्तीक शौचालयाचे बांधकाम या आर्थीक वर्षात पुर्ण करावयाचे असल्यामुळे, सदरील कामे अल्प मुदतीत करावयाचे असल्याने व कामाची तातडी लक्षात घेता कामे निविदा प्रक्रिया हाती घेवुन करण्यासाठी होणारा विलंब लक्षात घेता वरील अर्धशासकीय पत्राच्या संदर्भानुसार नोंदणीकृत कंत्राटदार यांना काम सम समान पध्दतीने वाटप करुन, अंदाजपत्रक दरावर म्हणजे रु १७,०००/- प्रति शौचालय या दराने विना निविदा काम हाती घेण्यासाठी सदरचा प्रस्ताव स्थायी समितीच्या मान्यतेस्तव सादर. दिनांक १८.१२.२०१५ पर्यंत स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत क्षेत्रीय कार्यालय निहाय प्राप्त झालेल्या पात्र व अपात्र लाभधारकांची संख्या दर्शविणारा तक्ता.

| अ.क्र. | झोन क्रमांक | पात्र लाभधारकांची संख्या | अपात्र लाभधारकांची संख्या | एकूण |
|---|---|---|---|---|
| ०१ | अ | ३१९ | ५२१ | ८४० |
| ०२ | ब | ५५० | ५७२ | ११२२ |
| ०३ | क | ८८४ | ५७१ | १४५५ |
| ०४ | ड | ७२२ | २२५ | ९४७ |
| **एकूण** | | **२४७५** | **१८८९** | **४३६४** |

**दिनांक १८.१२.२०१५ पर्यंत स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत वार्ड निहाय प्राप्त झालेल्या पात्र लाभधारकांची संख्या दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | झोन क्रं. | वार्ड क्रमांक | पात्र लाभधारकांची संख्या |
|---|---|---|---|
| १ | A | वार्ड क्रं. ०१ | ११४ |
| २ | A / B | वार्ड क्रं. ०२ | ३८ |
| ३ | A / B | वार्ड क्रं. ०३ | २०४ |
| ४ | B | वार्ड क्रं. ०४ | ३६ |
| ५ | B | वार्ड क्रं. ०५ | ०५ |
| ६ | B | वार्ड क्रं. ०६ | ०७ |
| ७ | A | वार्ड क्रं. ०७ | ५७ |
| ८ | B | वार्ड क्रं. ०८ | १२ |
| ९ | B | वार्ड क्रं. ०९ | |

| | | | |
|---|---|---|---|
| १० | B | वार्ड क्रं. १० | |
| ११ | B | वार्ड क्रं. ११ | |
| १२ | B | वार्ड क्रं. १२ | ३५ |
| १३ | B | वार्ड क्रं. १३ | ७७ |
| १४ | B | वार्ड क्रं. १४ | ५१ |
| १५ | B | वार्ड क्रं. १५ | ७२ |
| १६ | B | वार्ड क्रं. १६ | ०९ |
| १७ | B | वार्ड क्रं. १७ | १९ |
| १८ | B | वार्ड क्रं. १८ | १३ |
| १९ | C | वार्ड क्रं. १९ | ४५७ |
| २० | C | वार्ड क्रं. २० | १८१ |
| २१ | C | वार्ड क्रं. २१ | १३ |
| २२ | C | वार्ड क्रं. २२ | ०६ |
| २३ | C | वार्ड क्रं. २३ | ०२ |
| २४ | C | वार्ड क्रं. २४ | ६३ |
| २५ | C | वार्ड क्रं. २५ | ४८ |
| २६ | C | वार्ड क्रं. २६ | |
| २७ | C | वार्ड क्रं. २७ | |
| २८ | C | वार्ड क्रं. २८ | २२ |
| २९ | C | वार्ड क्रं. २९ | ०३ |
| ३० | C | वार्ड क्रं. ३० | १७ |
| ३१ | C | वार्ड क्रं. ३१ | १० |
| ३२ | C | वार्ड क्रं. ३२ | |
| ३३ | C | वार्ड क्रं. ३३ | ४५ |
| ३४ | C | वार्ड क्रं. ३४ | ८९ |
| ३५ | C | वार्ड क्रं. ३५ | ९२ |
| ३६ | D | वार्ड क्रं. ३६ | १७२ |
| ३७ | D | वार्ड क्रं. ३७ | ३०१ |
| ३८ | D | वार्ड क्रं. ३८ | |
| ३९ | D | वार्ड क्रं. ३९ | ०१ |
| ४० | D | वार्ड क्रं. ४० | २०४ |
| | **एकूण** | | २४७५ |

**उमेशसिंह चव्हाण** शहरात बिएसयुपी व डिआरडी योजने अंतर्गत बांधकाम करण्यात आलेले असून या योजने अंतर्गत लाभार्थ्यांना टॉयलेटचे बांधकाम करुन देण्यात आलेले आहे. सर्व्हेमध्ये एकूण २४७५ नागरीकांकडे टॉयलेटची व्यवस्था नसल्याचे आढळून आलेले आहे. आमचे प्रशासनास एवढेच म्हणणे आहे जर बिएसयुपी ,डिआरडी योजने अंतर्गत टॉयलेट बांधून देण्यात आलेले असेल तर पुन्हा स्वच्छ भारत योजने अतर्गत टॉयलेट बांधून देण्यात येवू नये, एकाच लाभार्थ्यांना असे दोन्ही योजनेचा लाभ मिळणार नाही याची दक्षता घ्यावी, असे प्रकार झाल्यास त्यास प्रशासना जबाबदार राहिल.

**विनय गुर्रम** स्वच्छ भारत योजने अंतर्गत टॉयलेटचे बांधकाम करण्यासाठी नागरींकाकडून ओळखपत्र म्हणून राष्ट्रीयकृत बॅकेच्या बॅकेच्या पासबुक झेराकसची मागणी करण्यात येत आहे. काही नागरीकाकडे बॅकेचे पासबुक नाही कांहीचे पासबूक हरवलेले आहे लाभार्थ्याकडे ओळखपत्र नसेल तर त्यांना टॉयलेट बांधून देणार आहे किंवा नाही.

**आयुक्त** स्वच्छ भारत अभियांन अंतर्गत व्यक्तीगत टॉयलेटचे बांधकाम करण्यासाठी रु. १७,०००/- चे अंदाजत्रक तयार करण्यात आलेले असून यामध्ये केंद्र शासनाकडून रु. ४,०००/- राज्य शासनाकडून रु. ८०००/-निधी मिळणार असून उर्वरीत रु. ५०००/- निधी महानगरपालिकेच्या फंडातून किंवा १४ व्या वित्त आयोगाच्या निधीतून खर्च करावयाचा आहे. नुकतीच नांवामनपा सर्वसाधारण सभेने प्रती टॉयलेट रु. ५०००/ या प्रमाणे १४ व्या वित्त आयोगाच्या निधीतून खर्च करण्यास मान्यता दिलेली आहे.शासनाकडून प्राप्त झालेल्या निर्देषानुसार दिनांक ८ ऑगस्ट २०१४ ला प्रत्येक झोन निहाय बिल कलेक्टर मार्फत वैयक्तीक टॉयलेटचा सर्वे करण्यात आला यामध्ये ४३६४ नागरीकांनी आमचेकडे टॉयलेट नसल्याचे सांगितलेले आहे. शासनाचे त्यावेळेच्या परिस्थितीनूसार लाभार्थ्यानी व्यक्तीगत टॉयलेटचे बांधकाम करावे असे निर्देष होते. जसे आपण बिएसयुपी योजने अंतर्गत काही लाभार्थ्याना स्वत: घराचे व टॉयलेटचे बाधंकाम करण्यास परवानगी दिली होती व त्यांना तीन हस्यात त्यांचे आयएफएसडी कोड असलेल्या राष्टीय बॅकेच्या खात्यात नियमानुसार देयकाचा भरणा करण्यात येत होता त्याच

धर्तीवर टॉयलेटचे बांधकाम करावाचे होते परंतु नंतरच्या काळात लाभार्थ्यांना स्वतः टॉयलेटचे बांधकाम करण्यासाठी लागणारे किरकोळ बांधकाम साहित्य मिळणार नाही, मिस्त्री मिळणार नाही परिणामी टॉयलेटची बांधकामे लवकर होणार नाही म्हणून, केंद्र शासनाच्या शहरी विकास मंत्रालय संयुक्त सचीव एंव मिशन निदेशक (S.B.M) यांनी प्रधान सचिव, नगरविकास विभाग यांना अर्ध शासकीय पत्र क्रं. १२/४०/२०१५ S.B.M दिनांक १७ नोव्हेंबर २०१५ अन्वये नोंदणीकृत व पात्र कंत्राटदारांना एकदाच रु. ३०.०० लक्ष पर्यंत १५० वैयक्तीक शौचालयाचे बांधकाम सम समान व रास्त पध्दतीने वाटप करुन जलद गतीने काम पुर्ण करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार प्रधान सचिव, नगरविकास विभाग, यांनी केंद्र शासनाचे पत्राचा संदर्भ देवून टायलेटचे बांधकाम लवकरात लवकर पुर्ण व्हावीत म्हणून कामाची तातडी व गरज लक्षात घेता ही कामे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील अनुसुची ड प्रकरण ५ मधील नियम (२) मधील तरतूदीनूसार आताच सांगितल्याप्रमाणे रास्त पध्दतीने अंदाजपत्रक दरावर टॉयलेटची बांधकाम करणेसाठी कळविलेले आहे त्याप्रमाणे प्रस्ताव तयार करुन तो मान्यतेसाठी स्थायी समितीसमोर ठेवण्यात आलेला आहे. शासनाचे स्पष्ट निर्देष आहे की जो नागरीक जेथे राहतो तेथे टॉयलेट नसेल तर तेथे टॉयलेटचे बांधकाम करुन देण्यात यावे जेणे करुन तो उघडयावर जाणार नाही. ब्रम्हपुरी भागात बिएसयूपी योजने अंतर्गत घराचे बांधकाम करण्यासाठी औकाफ बोर्डाने, इनामदार यांनी आक्षेप घेतलेले आहे परंतु त्यांना टॉयलेटचे बांधकाम करण्यास विरोध करता येणार नाही. संबंधित प्रभागाच्या सदस्यांनी त्यांना प्रेमाने सांगावे की जेव्हा जागेचा निकाल लागेल त्यावेळी तुम्ही घराचे व टॉयलेटच्या बांधकामासह जागा ताब्यात घ्यावी, टायलेटच्या बांधकामास विरोध करीत असेल तर ३५३ खाली आपणाविरुध्द कार्यवाही करण्यात येईल असे स्पष्ट सांगण्यात यावे.

शासनाचे असे निर्देष आहे की जेथे जोडपे राहते, त्यांना शौचालय नाही, घराची जागा २७० चौ. फुटाची जागा आहे अशा ठिकाणी टॉयलेटचे बांधकाम करण्यात यावे, त्यामूळे भाडेकरुना सुध्दा टॉयलेटचे बांधकाम करुन देता येईल. पण पुर्वीचे टॉयलेट असंतानाही दुसरे टायलेटचा लाभ देण्यासाठी कोणी शिफारस करीत असेल तर ते चालणार नाही, असा कोणी डबल लाभ घेतल्याचे निर्देशनास आल्यास संबंधिता विरुध्द कायदेशिर कार्यवाही करण्यात येईल.

लाभार्थ्यांची यादी इंटरनेटवर प्रसिध्द करण्यात येणार आहे. टॉयलेटच्या बांधकामाचा सविस्तर अहवाल शासनास सादर करावायाचा आहे. मार्च २०१५ अखेर आपणास १७०० टायलेटचा बांधकामाचे उदिष्ट देण्यात आलेले असून हे काम वेगाने पुर्ण करावयाचे आहे. ज्या कंत्राटदाराना टायलेटचे बांधकामाचे आदेश देण्यात येतील त्यांची माहिती सबंधित प्रभागाचे नगरसेवकांना देण्यात येईल. नगरसेवकांनी आपल्या प्रभागातील टॉयलेटचे बांधकामे त्यांचेकडून पुर्ण करुन घ्यावीत. शहरातील टॉयलेटचा सर्व्हे काटेकोरपणे करण्यात आलेला असून एकही नांव सुटेलेले नाही तरी पण काही नागरीक सर्व्हे झालेला नाही आमची नांवे आलेली नाहीत अशा प्रकारचे आक्षेप घेतील त्यामूळे ज्यांचे लाभार्थ्यांची नांवे यादीत नाहीत त्यांचे नांवे लाभार्थी यादीत समाविष्ट करण्यासाठी स. सदस्यांनी प्रभागातील नागरीकानां जाहिर आवाहन करावे व आलेली नावे संबधित विभागास द्यावीत. संबंधित प्रभागाकरीता नेमण्यात आलेला कनिष्ट अभियंता स्थळ पाहणी करुन टायलेट आहे किंवा नाही हे तपासून अहवाल सादर करतील कनिष्ट अभियंता यांचे अहवालानूसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**विनय गुर्रम** एकद्या मालमत्तेत घरमालक व तीन चार भाडेकरु राहतात व त्यांना टॉयलेट कमी पडत असेल त्या ठिकाणी या योजने अंतर्गत टायलेटचे बाधकाम करता येईल काय

**आयुक्त** भाडेकरुंना टॉयलेट बाथरुम ई.ची सुविधा उपलब्ध्द करुन देण्याची जबाबदारी घरमालकाची आहे ते जर ही सुविधा उपलब्ध्द करुन देत नसेल व त्या ठिकाणी ५४० चौ.फुटाची जागा असेल व घरमालक भाडेकरुकरीता टायलेट चे बांधकाम करुन देण्यास संमती देत असेल तर त्या ठिकाणी आपणास टॉयलेटचे बांधकाम करता येइल. शासनाचा एवढाच उध्देश आहे किं कुणीही व्यक्ती उघडयावर शौचालयास जावू नये .भाडेकरुस टॉयलेटची सुविधा दिली नाही तर तो उघडयावर जाईल. फक्त आलेल्या निधीचा गैरवापर होणार नाही याची दक्षता घ्याववयाची आहे.स्वच्छ भारत अभियान अंतर्गत तीन प्रकारचे टायलेटचे बांधकाम करण्याची योजना आहे. १) वैयक्तीक टॉयलेटचे बांधकाम ज्यावर आपण चर्चा करीत आहोत २) २५-३० घराकरीता कम्युनिटी टॉयलेटचे बांधकाम.यापुर्वी महानगरपालिकेने अशा प्रकारचे टॉयलेटचे बांधकाम केलेले आहेत परंतु नागरीकांनी त्यांचा योग्य वापर न करता खराब करुन टाकलेले आहेत त्यामूळे कम्युनिटी टॉयलेटचे बांधकाम आपण करणार नाही. मा.मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांच्या समोर या योजनेचे जेव्हा सादरीकरण करण्यात आले त्यावेळी एकमेव नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेने क्युनिटी टॉयलेटचे बांधकाम करण्यात येणार नाही असे सांगितले.३) पीपीपी तत्वावर सार्वजनिक टॉयलेटचे बांधकाम .नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या हृध्दीतील लोकसंख्यानुसार ५२२ सार्वजनिक टॉयलेटची आवश्यकता असून त्यापैकी २१४ टॉयलेट उपलब्ध्द आहे.उर्वरीत ३०८ टॉयलेटचे पीपीपी तत्वावार विविध भागात बांधकाम करण्याचा प्रस्ताव दिलेला असून यामध्ये १८८ टॉयलेट महिला करीता

व १२० टायलेट पुरुषाकरीता बांधावयाचे आहे.यामध्ये महानगरपालिकेने पाणी कनेक्यशन व टायलेटचे कनेक्शन मलवाहिनीला जोडून द्यावयाचे आहे.

**संजय मोरे** एकाच कुटूंबातील तीन चार भाऊ वाडयात राहतात व त्यांना एकच टॉयलेट आहे अशा परिस्थितीत त्यांना या योजने अंतर्गत स्वतंत्र टॉयलेटचे बांधकाम करता येईल काय

**आयुक्त** एकाच वाडयात तीन चार भाऊ राहत असतील व नंतर ते विभक्त झाले व प्रत्येकाच्या नावावर २७० चौरस फुटाची जागा आहे त्याचे नावाचे स्वतंत्र पिआर कार्ड व शिधापत्रिका आहे तर प्रत्येक भावास टॉयलेटचे बांधकाम करुन देता येईल.

**सभापती** स्वच्छ भारत अभियान अंतर्गत बांधावयाचे टॉयलेच्या संदर्भात श्री उमेशसिंह चव्हाण, श्री विनय गुर्रम व श्री संजय मोरे यांनी त्यांना येत असलेल्या शंका उपस्थित केल्या व या शंकाचे आयुक्त साहेबांनी अत्यत चांगल्या पध्दतीने निरसन करुन समाधान केलेल आहे. आमचे एवढेच म्हणणे आहे की या योजनेत कोणताही लाभार्थी वंचित राहू नये,तसेच बिएसयुपी व डिआरडी अंतर्गत ज्या घराचे बांधकाम करण्यात आलेले आहे त्यांना यापुर्वीच टॉयलेटचा लाभ देण्यात आलेला असल्यामूळे स्वच्छ भारत अभियान अंतर्गत पुन्हा टॉयलेटचा लाभ देण्यात येवू नये याची जबाबदारी प्रशासनावर राहिल. आयुक्तांनी जो प्रस्ताव सादर केलेला आहे त्यास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं. १८५** **ठराव**

केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत अभियान (नागरी) च्या धर्तीवर राज्यामध्ये स्वच्छ महाराष्ट्र (नागरी) हे एक अभियान म्हणुन राबविण्यास शासन निर्णय, नगरविकास विभाग, क्रं. स्वभाअ/२०१५/प्र.क्र.२३/नवि-३४, दिनांक १५ मे २०१५ अन्वये मान्यता देऊन शासनाने, शासन परिपत्रक क्रं. राअसं/कार्यान्वयन सुचना/४२/१५१६, दिनांक २८ जुलै २०१५ अन्वये, राज्यातील शहरामधील उघडयावर शौच करण्याचे प्रथा बंद करुन शहर हे हंगदारी मुक्त करण्या संदर्भात कार्यान्वयन सुचना दिल्या आहेत. या अंतर्गत स्वच्छ महाराष्ट्र अभियानाच्या अमलबजावणीसाठी स्वतंत्र कक्ष स्थापन करुन, अमलबजावणी कक्षामार्फत सर्वेक्षण, माहीतीचे संकलन, कृती आराखडया तयार करणे. जनजागृती, अर्ज मागविणे, स्थळ निरीक्षण, अर्ज मंजुरी, शौचालय बांधकामाचे नमुने, पर्यवेक्षण पुर्णत्व अहवाल, संकेत स्थळावर माहिती भरणे, व प्रगती अहवाल पाठविणे इत्यादी कार्यवाहीचे टप्पे नमुद केले आहेत. वरील शासन परिपत्रकानुसार, महानगरपालिका नांदेडने महापालिका क्षेत्रातील सर्वेक्षणाचे काम दिनांक ०८.०८.२०१५ रोजी हाती घेवुन, त्या अंतर्गत एकूण ४२०४ लाभार्थ्यांचे विहीत जोडपत्राअन्वये माहितीचे संकलन करण्यात आले या नंतर क्षेत्रीय कार्यालय निहाय वसुली लिपीक यांच्या मार्फत जोडपत्र-२ तसेच तांत्रीक कर्मचारी यांचे मार्फत स्थळ निरीक्षण करण्यात येऊन पात्र व अपात्र लाभार्थ्यांची यादी तयार करण्यात आली आहे. प्रभागनिहाय एकूण पात्र लाभार्थ्यांची यादी अवलोकनार्थ सादर. शासनाने वैयक्तीक शौचालय बांधकामासाठी केंद्र व राज्य शासनाच्या हिश्याचा निधीचा पहीला हप्ता रुपये २६६.१३ लक्ष महापालिकेस वितरीत केला असुन सन २०११ च्या जनगणने नुसार शौचालयाचे सुविधा उपलब्ध नसल्याने उघडयावर शौचास जाणा-या कुटूंबाची संख्या १२,०७३ आहे. यानुसार पहिला टप्यात २१९५ वैयक्तीक शौचालय बांधकामाचे उदिष्ट आहे.

राज्य स्तरावर वर्षनिहाय असलेल्या वैयक्तीक शौचालयाचा अनुशेष भरुन काढण्याच्या दृष्टीने तातडीचे धोरण ठरवीने गरजेचे असल्यामुळे केंद्र शासनाच्या शहरी विकास मंत्रालय संयुक्त सचीव एंव मिशन निदेशक (S.B.M) मा. श्री प्रवीण प्रकाश यांनी अर्ध शासकीय पत्र क्रं. १२/४०/२०१५ S.B.M दिनांक १७ नोव्हेंबर २०१५ अन्वये नोंदणीकृत व पात्र कंत्राटदारांना एकदाच रु. ३०.०० लक्ष पर्यंत १५० वैयक्तीक शौचालयाचे बांधकाम सम समान व रास्त पध्दतीने वाटप करुन जलद गतीने काम पुर्ण करण्याचे निर्देश दिले आहेत. महापालिका क्षेत्रातील एकूण (२४७५) पात्र वैयक्तीक शौचालयाचे बांधकाम व यापुढील पात्र होणा-या वैयक्तीक शौचालयाचे बांधकाम या आर्थीक वर्षात पुर्ण करावयाचे असल्यामुळे, सदरील कामे अल्प मुदतीत करावयाचे असल्याने व कामाची तातडी लक्षात घेता कामे निविदा प्रक्रिया हाती घेवुन करण्यासाठी होणारा विलंब लक्षात घेता वरील अर्धशासकीय पत्राच्या संदर्भानुसार नोंदणीकृत कंत्राटदार यांना काम सम समान पध्दतीने वाटप करुन, अंदाजपत्रक दरावर म्हणजे रु १७,०००/- प्रति शौचालय या दराने विना निविदा काम हाती घेण्यासाठी हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मान्यता देते तसेच दिनांक १८.१२.२०१५ पर्यंत स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत क्षेत्रीय कार्यालय निहाय प्राप्त झालेल्या पात्र व अपात्र लाभधारकास हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

| अ.क्र. | झोन क्रमांक | पात्र लाभधारकांची संख्या | अपात्र लाभधारकांची संख्या | एकूण |
|---|---|---|---|---|
| ०१ | अ | ३१९ | ५२१ | ८४० |
| ०२ | ब | ५५० | ५७२ | ११२२ |
| ०३ | क | ८८४ | ५७१ | १४५५ |
| ०४ | ड | ७२२ | २२५ | ९४७ |
| **एकूण** | | **२४७५** | **१८८९** | **४३६४** |

**दिनांक १८.१२.२०१५ पर्यंत स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत वार्ड निहाय प्राप्त झालेल्या पात्र लाभधारकांची संख्या दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | झोन क्रं. | वार्ड क्रमांक | पात्र लाभधारकांची संख्या |
|---|---|---|---|
| १ | A | वार्ड क्रं. ०१ | ११४ |
| २ | A / B | वार्ड क्रं. ०२ | ३८ |
| ३ | A / B | वार्ड क्रं. ०३ | २०४ |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | B | वार्ड क्रं. ०४ | ३६ |
| ५ | B | वार्ड क्रं. ०५ | ०५ |
| ६ | B | वार्ड क्रं. ०६ | ०७ |
| ७ | A | वार्ड क्रं. ०७ | ५७ |
| ८ | B | वार्ड क्रं. ०८ | १२ |
| ९ | B | वार्ड क्रं. ०९ | |
| १० | B | वार्ड क्रं. १० | |
| ११ | B | वार्ड क्रं. ११ | |
| १२ | B | वार्ड क्रं. १२ | ३५ |
| १३ | B | वार्ड क्रं. १३ | ७७ |
| १४ | B | वार्ड क्रं. १४ | ५१ |
| १५ | B | वार्ड क्रं. १५ | ७२ |
| १६ | B | वार्ड क्रं. १६ | ०९ |
| १७ | B | वार्ड क्रं. १७ | १९ |
| १८ | B | वार्ड क्रं. १८ | १३ |
| १९ | C | वार्ड क्रं. १९ | ४५७ |
| २० | C | वार्ड क्रं. २० | १८१ |
| २१ | C | वार्ड क्रं. २१ | १३ |
| २२ | C | वार्ड क्रं. २२ | ०६ |
| २३ | C | वार्ड क्रं. २३ | ०२ |
| २४ | C | वार्ड क्रं. २४ | ६३ |
| २५ | C | वार्ड क्रं. २५ | ४८ |
| २६ | C | वार्ड क्रं. २६ | |
| २७ | C | वार्ड क्रं. २७ | |
| २८ | C | वार्ड क्रं. २८ | २२ |
| २९ | C | वार्ड क्रं. २९ | ०३ |
| ३० | C | वार्ड क्रं. ३० | १७ |
| ३१ | C | वार्ड क्रं. ३१ | १० |
| ३२ | C | वार्ड क्रं. ३२ | |
| ३३ | C | वार्ड क्रं. ३३ | ४५ |
| ३४ | C | वार्ड क्रं. ३४ | ८९ |
| ३५ | C | वार्ड क्रं. ३५ | ९२ |
| ३६ | D | वार्ड क्रं. ३६ | १७२ |
| ३७ | D | वार्ड क्रं. ३७ | ३०१ |
| ३८ | D | वार्ड क्रं. ३८ | |
| ३९ | D | वार्ड क्रं. ३९ | ०१ |
| ४० | D | वार्ड क्रं. ४० | २०४ |
| | **एकूण** | | २४७५ |

**विषय क्रं.३**

नावाशमनपा **हद्दीत आनंदनगर भागात प्रभाग क्रं. ५ मध्ये श्री पवार यांचे घर ते श्री थेटे यांच्या घरा पर्यंत सी.सी. रस्ता** करणेसाठी या विभागाचे कनिष्ठ अभियंता व उपअभियंता यांनी प्रत्यक्ष स्थळ पहाणी केली असता सदरचे काम करणे आवश्यक असून सदर कामासाठी आवश्यक बाबींचा समावेश करुन जिल्हादर सुची २०१४-१५ नुसार **रुपये ४,५६,०००/-** चे अंदाजपत्रक सादर करुन सदर काम **श्री जी.आर. देशमुख कंत्राटदार नांदेड** यांचेकडून करुन घेण्यात आले. कामाची निकड व तातडी लक्षात घेता सदरचे काम विना निविदा रास्त पध्दतीने अंदाजपत्रक दरावर श्री जी.आर. देशमुख कंत्राटदार नांदेड यांचेकडून करुन घेण्यात आले त्यास व कामावर झालेला खर्च रुपये ४,५६,०००/- यास कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मंजुरीसाठी प्रस्ताव महाराष्ट्र मनपा अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ कलम २ नुसार सादर.

**सभापती** आयुक्तांनी सादर केलेल्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं. १८६** **ठराव**

नावाशमनपा **हद्दीत आनंदनगर भागात प्रभाग क्रं. ५ मध्ये श्री पवार यांचे घर ते श्री थेटे यांच्या घरा पर्यंत सी.सी. रस्ता** करणेसाठी या विभागाचे कनिष्ठ अभियंता व उपअभियंता यांनी प्रत्यक्ष स्थळ पहाणी केली असता सदरचे काम करणे आवश्यक असून सदर कामासाठी आवश्यक बाबींचा समावेश करुन जिल्हादर सुची २०१४-१५ नुसार **रुपये ४,५६,०००/-** चे अंदाजपत्रक सादर करुन सदर काम **श्री जी.आर. देशमुख कंत्राटदार नांदेड** यांचेकडून करुन घेण्यात आले.

कामाची निकड व तातडी लक्षात घेता सदरचे काम विना निविदा रास्त पध्दतीने अंदाजपत्रक दरावर श्री जी.आर. देशमुख कंत्राटदार नांदेड यांचेकडून करुन घेण्यात आले त्यास व कामावर झालेला खर्च रुपये ४,५६,०००/- यास महाराष्ट्र मनपा अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ कलम २ नुसार कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मंजुरी ही मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्रं.४**

**नावाशमनपा हद्दीत पाणी पुरवठा व मलनिस्सारण झोन क्रं. सि अंतर्गत (वजीराबाद जुना झोन क्रं.४) मध्ये** कार्यकारी अभियंता यांनी सादर केलेल्या अहवालानुसार स्थानिक बाजार दराप्रमाणे **साहेल कन्सट्रकशन नांदेड** यांच्याकडून त्या भागातील **२८ हातपंप दुरुस्त करुन घेण्यात आले आहे**. त्यास **रुपये १,५०,०००/-** (अक्षरी रुपये एक लक्ष पन्नास हजार फक्त) खर्च झालेला आहे सदर कामास **कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मान्यतेस्तव** स्थायी समिती समोर सादर.

**विनय गुर्रम** — झोन क्र.४ मधील नगरसेवकानी त्यांचे प्रभागातील हातपम्प दुरुस्त करण्यासाठी संबंधित विभागाकडे लेखी तक्रार करुनही हातपम्प दुरुस्त करण्यात आलेला नाही. जे हातपंप दुरुस्त करण्यात आले ते खरोखरच कंत्राटदाराने दुरुस्त केले आहे किंवा नाही हे सबंधित अधिका-यांनी पहावयास पाहिजे.

**आयुक्त** — या वर्षी पावसाचे प्रमाण कमी असल्यामूळे विंधन विहिरी कोरडया पडत आहे किंवा जमिनीतील पाण्याची पातळी खाली गेलेली आहे,गोदावरी नदी जवळील विंधन विहीरीत पाणी असेल, परंतु गोदावरी नदीच्या दुर असलेले विंधन विहिरी ड्राय झालेल्या असतील त्यामूळे ड्राय विहिरीवरील हातपम्प चालू नसल्यामूळे नादुरुस्त होतात.ज्या विंधनविहिरीला पाणी आहे अशा विंधन विहिरीवरील बसविण्यात आलेले हातपम्प ना दुरुस्त झालेले असतील ते दुरुस्त करण्यासाठी स्वतंत्र पथक नेमलेले आहेत, उन्हाळयाचे दिवसात विंधनविहीरी ड्राय होतात, पाण्याची पातळी विंधन विहिरीच्या खोली पेक्षा खाली जाते आणि पाणी येत नसल्यामूळे हातपंप खराब झाल्याच्याही तक्रारी येत आहेत. नोव्हेंबर डिसेंबर हातपम्प दुरुस्तीच्या तक्रारी वाढतात ही बाब दरवर्षी होते ही प्रक्रिया बंद होणार नाही. नागरीकांकडून स.सदस्यांकडून प्राप्त झालेल्या तक्रारीनुसार सबंधित हातपम्पाची दुरुस्ती प्राधान्याने करण्यात येत आहे.वजिराबाद भागातील २८ हातपम्पाची दुरुस्ती करण्यात आलेली आहे.हे हातपम्प दुरुस्त झालेले नाही अशी आपली तक्रार आहे काय ज्या हातपम्पाची दुरुस्ती करण्यात आली त्याची प्रत्यक्ष पाहणी करुन ते हातपम्प दुरुस्ती झाल्याची खात्री संबंधित विभागाने करावी त्यानंतरच दुरुस्तीचे देयक सादर करावे.

**विनय गुर्रम** — स्थायी समितीच्या सभेस महानगरपालिकेचे सर्व विभाग प्रमुख उपस्थित रहात नाही, आज विभाग प्रमुखांची संख्या कमी आहे.

**आयुक्त** — दोन तीन अधिकारी सुटीवर आहेत, यापुढे मी स्वत: स्थायी समितीच्या सभेत उपस्थित राहणार आहे त्यामूळे आपल्या प्रश्नाची उत्तरे देण्यास अडचण येणार नाही.

**उमेशसिंह चव्हाण** — उन्हाळयाचे दिवस असल्यामूळे शहरात पाणी टंचाई निर्माण झाली आहे त्यामूळे पाणी टक्षेत्रिय अधिका-याकडून त्यांचे हदीत एकूण किती विंधनविहिरी आहेत त्यापैकी किती विधन विहिरीला पाणी आहे किती विहिरी ड्राय झाल्या पाणी असलेल्या विधन विहिरीवरील किती हातपम्प चालू आहेत किती हातपम्प ना दुरुस्त आहेत याची माहिती मागविण्यात यावी. ना दुरुस्त हातपम्प प्राधान्याने दुरुस्ती करण्याची कार्यवाही करण्यात यावी.

**सभापती** — आयुक्तांनी सादर केलेल्या प्रस्तावास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं. १८७** **ठराव**

**नावाशमनपा हद्दीत पाणी पुरवठा व मलनिस्सारण झोन क्रं. सि अंतर्गत (वजीराबाद जुना झोन क्रं.४) मध्ये** कार्यकारी अभियंता यांनी सादर केलेल्या अहवालानुसार स्थानिक बाजार दराप्रमाणे **साहेल कन्सट्रकशन नांदेड** यांच्याकडून त्या भागातील **२८ हातपंप दुरुस्त करुन घेण्यात आले आहे**. त्यास **रुपये १,५०,०००/-** (अक्षरी रुपये एक लक्ष पन्नास हजार फक्त) खर्च झालेला आहे सदर कामास **कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक** मंजुरी हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्रं.५** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीत आरोग्य विभागाशी संबंधीत जनतेच्या आरोग्याशी निगडीत विषयावर चर्चा करणे.

**सुचक** :- श्री उमेश अशोकसिंह चव्हाण — **अनुमोदक** :- श्री फारुख हुसेन कासीम साब

**उमेशसिंह चव्हाण** — २००८ मध्ये डास प्रतिबंधात्मक उपाय योजना करण्यासाठी मोठी फॉगिग मशिन खरेदी करण्यात आली होती ती मशिन अनेक दिवसापासुन बंद आहे ती कुठे गेली. ती दुरुस्त का करण्यात येत नाही.

**मुख्य वैद्यकिय अधिकारी** — मोठी फॉगिग मशिन खरेदी करण्यात आली होती ती काही दिवस चालली नंतर ती नादुरुस्त झाली,या मशिनचे स्पेअरपार्ट देशात मिळत नसल्यामूळे ती दुरुस्त होत नाही.

**आयुक्त** — शहरात मलेरिया ऑईल फवारणी करण्याकरीता १५ हॅंण्डमशिन उपलबध्द असून त्याव्दारे पाणी साचलेल्या डबक्यात व नाल्यावर मलेरियाची फवारणी करण्यात येते.फवारणी करण्याकरीता या हॅण्ड मशिन पुरेशा आहेत. मलरिया विभागाने ज्या भागात डासाची उत्पत्ती होती त्या भागात जसे गोदावरी नदीच्या बाजूस असलेल्या नालीवर ,डबक्यात, ज्या ठिकाणी पाणी साचते अशा दलदलीच्या ठिकाणी व सखल भागात वसरणी, कौठा, तरोडा या भागात नाल्या नसल्यामूळे साचत असलेल्या पाण्याच्या ठिकाणी प्रथम प्राधान्याने मलेरिय ऑईल

फवारणीची कार्यवाही करावी.सभागृहास मी सांगू इच्छितो की सध्या नांदेड शहरात मलेरिय किंवा डेग्युची साथ नाही. नांदेड शहरात वैद्यकिय उपचारासाठी नांदेड शहरातील ,नांदेड जिल्हयातील ,परभणी, हिंगोली, लातूर जिल्हहयातील काही भागातील नागरीक येतात.जवळपास १७-१८ लाख लोकसंख्याचे मेंडीकल प्रेशर आहे.जिल्हयातील बाहेरच्या जिल्हयातील नागरीक डेग्युच्या तपासणीसाठी येतात व त्यावर उपचार करण्यासाठी हैद्राबाद किंवा औरंगाबादला जातात. मुख्य वै.अधिकारी यांनी दिलेल्या माहितीनूसार आजच्या परिस्थितीत जे डेग्युचे रुग्ण आहेत ते नांदेड शहरातील रुग्ण नाहीत.

**उमेशसिंह चव्हाण** आमची एवढीच मागणी आहे की प्रत्येक प्रभागातील नाल्यावर व सखल भागात ,दलदलीच्या ठिकाणी पाणी साचलेल्या डबक्यात दर तीन दिवसाला मलेरिया ऑईलची फवारणी करण्यात यावी.

**आयुक्त** मुख्य वैद्यकिय आरोग्याधिकारी यांनी स्थायी समितीला नियमिती आरोग्य विषयक आकडेवारीचा अहवाल द्यावयास पाहिजे. तो का देण्यात येत नाही. मुख्य वैद्यकिय अधिकारी यांना सुचना करण्यात येते की ,स्थायी समितीला साथीच्या रुग्णांची आकडेवारी,वसरणी ,कोठा,असदवन भागातील पाणी नमूने तपासणी अहवाल (पॉझिटिव्ह निगेटिव्ह) मलेरिया विभागने फवारणी केलेल्या कामाचा अहवाल,ई.अहवाल देत जावा जेणे करुन स.सदस्यांना अशा प्रकारचे प्रस्ताव देण्याची गरज पडणार नाही.

**संजय मोरे** स्थायी समितीला ८-१५ दिवसाला मुख्य लेखाधिकारी, मुख्यलेखा परिक्षक, अंतर्गत लेखापरिक्षक यांनी, महानगरपालिकेचा जमा खर्चाचा लेखा जोगा अहवाल, लेखापरिखण अहवाल, द्यावयास पाहिजे परंतु आज पर्यत असा अहवाल आम्हाला देण्यात आलेला नाही.

**आयुक्त** स्थायी समिती मागत नाहीत त्यामूळे संबंधित अधिकारी अहवाल देत नाही.महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदीनूसार मुख्य लेखाधिकारी, यांनी स्थायी समितीला दर पंधरा दिवसाला महानगपालिकेचा जमा खर्चाचा लेखा जोगा शिल्लक जमा रक्कमेचा अहवाल द्यावयास पाहिजे तसेच मुख्य लेखापरिक्षक अंतर्गत लेखापरिक्षक यांनी महानगरपालिकेच्या लेख्यांची साप्ताहिक तपासणी करुन लेखापरिक्षणाचा आपला अहवाल दर आठवडयाला स्थायी समितीला देणे बंधनकारक आहे तो का देण्यात येत नाही.यापुढे मुख्य लेखाधिकारी मुख्य लेखापरिक्षक अंतर्गत लेखापरिक्षक, व वैद्यकिय आरोग्य अधिकारी यांनी आरोग्य संबंधीत अहवाल व इतर सर्व संबंधित विभाग प्रमुखानी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदीनूसार आपल्या विभागाचा जो केलेल्या कामाचा अहवाल स्थायी समितीला देणे आवश्यक आहे तो स्थायी समितीला नियमित दर आठवडयाला देत जावा, अशा आशयाचे आदेश नगरसचिवानी त्वरीत काढावेत. सर्व विभाग प्रमुखांनी आपल्या विभागाची माहिती अपडेट करावी.

**विनय गुर्रम** शहरात ओपन लॅण्ड आहेत त्याचा गैरवापर होत असून महानगरपालिकेचेही आर्थिक नुकसानही होत आहे.त्यावर काय कार्यवाही करणार,

**आयुक्त** शहरात तीन प्रकारच्या ओपन लॅण्ड आहेत १) एकतर जागा डिसप्युट असल्यामूळे जागेचा विकास होत नाही. किंवा जागा मालकांनी फक्त जागा घेवून ठेवलेल्या आहेत किंवा तेथे बांधकाम करण्यास जागा मालकाच्या काही अडचणी आहेत तिसरे म्हणजे महानगरपालिका हध्दीत असदवन, वसरणी,तरोडा, कोठा हा जो नव्याने भाग समाविष्ट झालेल्या आहेत त्या भागात पुर्ण लोकवस्ती झालेली नसल्यामूळे जागा खुल्या आहेत, सर्व क्षेत्रिय अधिका-यांनी महानगरपालिका अधिनियमातील तरतूदीनूसार अशा ओपन लॅण्ड विरुध्द काय कार्यवाही करता येईल इतर महानगरपालिकेत ओपन लॅण्ड विरुध्द काही कार्यवाही करण्यात येते काय याबाबतची माहिती घेवून स्थायी समितीला अहवाल द्यावा त्यावर स्थायी समिती निर्णय घेईल.

**उमेशसिह चव्हाण** सर्व क्षेत्रिय अधिका-यांनी आपल्या हध्दीतील ओपन लॅण्डचा सर्व्हे करुन त्याची माहिती पुढील स्थायी समितीला देण्यात यावी.

**सभापती** श्री उमेशसिंह चव्हाण यांनी केलेल्या सुचने प्रमाणे ओपन लॅण्डचा सर्व्हे करुन त्याची माहिती पुढील स्थायी समितीला देण्यात यावी तसेच मलेरिया विभागाने पुर्ण शहराचा मलेरिया फवारणी कार्यक्रम निश्चित करुन तो सर्व स.सदस्यांना देण्यात यावा. संबंधित मलेरिया ऑईल फवारणी मजुराने ज्या ज्या प्रभागात मलेरिय ऑईलची फवारणी केली प्रभागातील नगरसेवकांची स्वाक्षरीत घेत जावी.मलेरिया विभाग प्रमुखांनी आठवडयातून दोनदा प्रत्येक प्रभागातील नाल्यांत, पाणी साचलेल्या डबक्यात मलेरिया फवारणी होईल याची दक्षता घ्यावी.सर्व विभाग प्रमुखांनी आपले विभाग ऍक्टीव ठेवावे. झालेल्या चर्चे प्रमाणे सर्व संबंधितांनी आपला अहवाल स्थायी समितीला देण्यात यावा.

**ठराव क्रं. १८८** **ठराव**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदीनूसार व स्थायी समितीचे अधिकारी व कर्तव्याच्या बाबी तपासून मुख्य लेखाधिकारी मुख्य लेखापरिक्षक अंतर्गत लेखापरिक्षक यांनी व इतर सर्व संबंधित विभाग प्रमुखानी आपल्या विभागाचा जो जो अहवाल स्थायी समितीला देणे आवश्यक आहे तो स्थायी समितीला नियमित देत जावा, असे ही नांवामनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते संमत करते.

**विषय क्रं.६** **प्रस्ताव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीतील रस्त्यांवर नो पार्कींग झोन मध्ये पार्कींग केलेल्या वाहनामुळे वारंवार वाहतुकीची कोंडी होत असल्यामुळे त्यावर उपाय योजना करण्यासाठी चर्चा करणे.

**सुचक** :- श्री उमेश अशोकसिंह चव्हाण **अनुमोदक**:- श्री फारुख हुसेन कासीम साब

**उमेशसिंह चव्हाण** शिवाजीनगर,कला मंदिर, वजिराबाद याभागात नो पार्कींग बोर्ड लावलेले असतांनाही त्याठिकाणी नागरीक दुचाकी व चार चाकी वाहन उभे करीत असल्यामूळे वाहतुकीची मोठया प्रमाणात कोंडी होती नो पार्कींग मध्ये उभी करणा-या विरुध्द वाहनधारकाविरुध्द कार्यवाही करण्यासाठी महानगरपालिकेने कंत्राट दिले होत नंतर कंत्राटदाराचे कंत्राट रध्द करणत आलेले आहे पुन्हा या कामासाठी कंत्राट देता येईल काय याचा खुलासा करण्यात यावा.

**आयुक्त** महानगरपालिकेने जेएनएनयूआरएम योजने अंतर्गत मुख्य रस्त्याचे रुंदीकरण करुन या रस्त्याच्या दोन्ही बाजूने लहान १००० सिसिचे कार व मोटार सायकल, सायकल पार्कीग करीता जागा सोडलेली आहे ,वाहने पार्कीग करीता रस्त्याच्या दोन्ही बाजूने सम व विषय तारखा निश्चित करुन पार्कीगचे व नो पार्कीगचे फलक ही लावण्यात आले होते यामध्ये महत्वाचा मुख्य रस्ता बर्की चौक ते राज बियर बार पर्यतचा रस्ताचाही समावेश आहे. मला देण्यात आलेल्या माहितीनूसार वाहनधारक आपली वाहने पार्कीगच्या जागेत उभी करत नसल्यामूळे त्यांना शिस्त लावण्यासाठी नो पार्कींग मध्ये लावण्यात येणारे वाहना विरुध्द कार्यवाही करण्यासाठी कंत्राट देण्यात आले होते परंतू कंत्राटदार संबंधितांना किती दंड आकारतो, कोणत्या वाहनांना दंड लावतो याची माहिती कार्यालयास मिळत नव्हती तसेच वाहने पार्कीगमध्ये लावलेली असतांना दंड लावण्यात येत आहे. महिलांना मुलींना अरेरावी करतात अशा प्रकारच्या मोठया प्रमाणात तक्रारी आल्यामूळे त्यांचे कंत्राट रध्द करण्यात आल्याची माहिती मिळाली आहे.कंत्राटदाराने ना पार्कीग मध्ये लावण्यात आलेले वाहन उचलल्यानंतर ते सिसिटिव्ही कॅमे-यामध्ये यावयास पाहिजे. शहरात मोठया प्रमाणात वाहतुकीस अडथळा निर्माण होत असल्यामूळे महाराष्ट्र शासनाने श्हारातील ना फेरीवाले झोन निश्चित करण्यासाठी नियम तयार करण्याचे ठरविलेले असून तशा प्रकारची प्रारुप अधिसुचना प्रसिध्द करुन नागरीकांकडून हरकती व सुचना मागविलेल्या आहेत,प्राप्त हरकती व सुचनेची सुनावणी होवून नंतर अंतिम नियम झाल्यानंतर नियमाची अमलबजावणी करण्यासाठी महानगरपालिकेकडे येईल. नांदेड शहरातील महत्वाचा बर्कीचौक ते राज बियर बार हा मुख्य रस्ता ना फेरीवाला झोन जाहिर झाल्यानंतर या रस्त्याच्या दोन्ही बाजूने नो पार्कीग झोन म्हणून आपणास करता येईल. नो पार्कीग झोन जाहिर केल्यानंतर आपणास नागरीकांना आपली वाहने उभी करण्यासाठी पर्यायी पे एण्ड पार्क वर पार्कीग झोनही जाहिर करावा लागेल.ना फेरीवाला क्षेत्र (नो वेडीग झोन) निश्चित करण्यासाठी जिल्हयाचे खासदार यांचे अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी व आयुक्त, टिव्हीसी समिती सदस्य यांची टावून वेडीग कमिटी कायम करण्यात आलेली असून ही समिती शहरातील ना फेरीवाला झोन निश्चित करतील.

**विनय गुर्रम** वजिराबाद, शिवाजीनगर भागातील वाहन विक्रेते व कमर्शियल कॉम्लेक्समधील मोठे दुकानदार वाहने रस्त्यावर आडवे तिडवे उभी लागतात त्यामूळे वाहतुकीस मोठया प्रमाणात अडथळा निर्माण होत आहे त्यांचे विरुध्द कार्यवाही करण्यात यावी.

**आयुक्त** शहरात अनाधिकृतपणे रस्त्यावर, कुठेही आपली वाहने कशीही उभी करतात या सर्व वाहनधारका विरुध्द कार्यवाही करण्यासाठी आपणाकडे पुरेसा कर्मचारी वर्ग नाही,मॅनपावर कमी आहे.

**संजय मोरे** संबंधित व्यापा-यांना रस्त्यावर वाहने उभी करण्यास निर्बध घालण्यात यावे. त्यांना कायदेशिर लेखी नोटीसा देवून दंड आकारण्यात यावा, यामूळे महानगरपालिकेचे उत्पन्न वाढेल, वाहतुकीचाही प्रश्न मिटेल,

**फारुख हुसेन** बर्की चौक, सराफा, इतवारा भाजीपाला मार्केट, मनियार गल्ली या ठिकाणी नो पार्कीग झोनचे फलक लावण्यात आलेले नसल्यामूळे नागरीक आपली वाहने कुठेही उभी करतात यामूळे वाहतुकीस अडथळा निर्माण होत आहे.

**आयुक्त** आताच खुलासा केल्याप्रमाणे राज्य शासनाने व टिव्हीसी कमिटीने शहरातील विविध भागात ना फेरीवाला झोन जाहिर केल्यानंतर त्या ठिकाणी वाहने उभी करता येणार नाही.

**संजय मोरे** शहरातील वजिराबाद भाग हा सर्वात जास्त रहदारीचा भाग असून वाहनधारक रस्त्यावरच वाहने उभी करीत असल्यामूळे नागरीकांना खुप त्रास होतो त्यामूळे वजिराबाद भागात पे एण्ड पार्क सुरु करावे.जेणे करुन वाहनधारकांना शिस्त लागेल.

**आयुक्त** शासनाने ना फेरीवाला झोन निश्चित केल्याशिवाय आपणास काहीच करता येणार नाही. ना फेरीवाला झोन जाहिर झाल्यानंतर त्या ठिकाणी वाहने पार्कीग करता येणार नाही ,सध्या परिस्थिती अशी आहे की. क्षेत्रिय अधिकारी रस्त्यावरील अतिक्रमण काढण्यास गेला की स.सदस्याचे रस्त्यावरील अतिक्रमण काढू नका राहू या अशा प्रकारचे फोन येतात अंधारात मला असे फोन करतात व उजेडात आरोप प्रशासनावर आरोप करतात,

**सभापती** नो पार्कींग झोनच्या संदर्भात आयुक्त साहेबांनी .खुप चांगली माहिती दिली. मा. खासदार साहेबांच्या अध्यक्षतेखाली जी टिव्हिसी कमिटी आहे त्यांचे अधिकारातील हा विषय आहे. बर्की चौक ते राज बियर बार पर्यतच्या रस्ता हा ना फेरीवाला झोन जाहिर झाल्यानंतर या मुख्य रस्त्यावर कोणत्याही प्रकारचे वाहने उभी

राहणार नाही. शासनाने व समितीने ना फेरीवाला झोन करण्याचा निर्णय घेतल्यानंतरच आपणास पार्कीग झोनचा निर्णय घेता येईल. आयुक्त साहेबानी जी माहिती दिली त्याची नोंद धेण्यात येते.

**ठराव क्रं. १८९** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्यीतील ना पार्कीग झोन व ना फेरीवाला झोन जाहिर करण्याचे सदर्भात आयुक्त,नांवामनपा यांनी जी सविस्तर माहिती दिली त्यांची नोदं हि नांवामनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते घेते.

**विषय क्रं.७** **प्रस्ताव**

केंद्र शासनाने शहरी भागा करिता घोषीत केलेल्या प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत आपल्या शहराचा समावेश आहे किंवा कसे तसेच या योजने बाबतची रुपरेषा कशी आहे या बाबतची माहिती सभागृहात सादर करुन चर्चा करणे बाबत.

**सुचक** :- श्री उमेश अशोकसिंह चव्हाण **अनुमोदक** :- श्री फारुख हुसेन कासीम साब

**आयुक्त** केंद्र शासनाने राजीव गांधी आवास योजनेचे रुपांतर प्रायमिनिस्टर हौसिंग फार ऑल या योजनेत केलेले आहे. केंद्र शासनाने दि.२५ जून २०१५ रोजी विज्ञान भवन दिल्ली येथे तीन योजना जाहिर केल्या १) सुंदर शहर (स्मार्ट सिटी) ज्यामध्ये देशातील १०० शहराचा विकास होणार आहे. **२)** पुनरुज्जीवन आणि शहरी परिवर्तन अटलबिहारी अभियान ( अमृत) ३) सर्वासाठी घरे (प्रायमिनिस्ट हौसिंग फॉर ऑल) पहिल्या दोन योनजे मध्ये शहरातील नागरीकांना मुलभूत नागरी सुविधा (इनफ्रास्ट्रक्चर) उपलब्ध्द करुन द्यावयाच्या आहेत.देशामध्ये साधारणत: २८ कोटी घरे असून २८ x ६ = १६८ कोटी एवढी लोकसंख्या आहे.साधारणत: देशामध्ये ६.५० कोटी घराची आवश्यकता आहे. सर्वासाठी घरे या योजनेमध्ये १) जमिन वापर खाजगी विकास सहभाग झोपडपटी पुनवर्सन :- यामध्ये महाराष्ट्र शासनाच्या, भारत सरकारच्या, संरक्षण दलाच्या ,रेल्वे विभागाचे जागेवर झालेल्या झोपडपटीतील नागरीकांना घरे बांधून देणे.२) क्रेडीट लिंक्ड अनुदाना माध्यमातून दुर्बल स्वस्त गृहनिर्माण या योजने मध्ये आर्थिक दृष्टया दुर्बल घटक (ईडब्ल्यूएस) व दुर्बल घटक सोसायटी (एलआयजी) लो विकर सेक्टर याघटकातील ज्या नागरीकाचे वार्षीक उत्पन्न रु.६.०० लाखापेक्षा कमी आहे त्यांना स्वत:चे जागेत घराचे बांधकामासाठी राज्य शासन रु.१.५० लाख,केंद्र शासन रु.१.०० लाख अनुदान देईल उर्वरीत रक्कम त्यांनी स्वत: टाकून घराचे बांधकाम करावयाचे आहे. दुसरी योजना आहे खाजगी लोकांच्या जागेवर अतिक्रमण होवून त्या ठिकाणी झोपडपटी झाली त्यासंबंधी जागेच्या मालकांनी गरीबासाठी ४,५,६ चा एफएसआय वापरुन किंवा टिडीआर वापरुन घराचे बांधकाम करुन द्यावयाचे आहे,तीसरी योजना आहे कंत्राटदाराने त्यांच्या मालकीच्या जागेवर ४,५,६ चा एफएसआय वापरुन किंवा टिडीआर वापरुन एलआयसी घरे बांधून शासनास हस्तांतर करावयाच व ती घरे शासनाने गरजुना वाटप करावयाची .चौथी योजना या संबंधिताकडे जागा आहे परंतु तिन्ही कॅटगिरीत बसत नाही अशा नागरीकांनी स्वत: जागेत बॅकेकडून कर्ज घेवून घराचे बांधकाम करावयाचे, बॅकेचा कर्जावरील व्याजाचा दर १३.५० टक्के आहे. त्यापैकी बॅकेचे ६.०० टक्के पर्यतच्या व्याजाचे पैसे संबंधीत नागरीकांनी भरावयावे उर्वरीत ८ टक्के व्याजाचे पैसे केंद्र शासनाने द्यावयाचे आहेत.अशी केद्र शासनाची सर्वासाठी घराची योजना आहे.

**उमेशसिंह चव्हाण** घराची योजना नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेसाठी लागू झालेली आहे काय महागनरपालिकेतील चतुर्थश्रेणी कर्मचारी या योजनेत भाग धेवू शकतो काय

**आयुक्त** संबंधित कर्मचा-याचे उत्पन्न रु. ६.०० लाखापेक्षा कमी असेल त्यांना या योजनेचा लाभ घेता येईल. त्याना घराचे बांधकामासाठी केंद्र शासनाचे रु. १.०० लक्ष व राज्य शासनाचे रु. १.५० अनुदान मिळू शकते. शहरातील कोणत्याही जाती धर्मातील ज्या नागरीकाचे वार्षिक उत्पन्न रु. ६.०० लाखा पेक्षा कमी आहे त्याचे महानगरपालिका हध्दीत त्यांचे नांवावर घर नाही आणि त्यांच्या नावावर स्वत:ची जागा आहे. त्यांना क्रेडीट लिंक्ड अनुदान माध्यमातून या योजने अतर्गत घराचे बांधकाम करता येईल. महाराष्ट्र शासनाच्या मंत्री मंडळाने क्रेडीट लिंक्ड अनुदान योजनेत राज्यातील ५४ शहराची ३४ जिल्हा परिषद अंतर्गत येणा-या शहराची निवड करण्याचा निर्णय धेतलेला आहे. नागपुर अधिवेशन संपल्यानंतर सविस्तर शासन निर्णय आपणास प्राप्त होईल. बीएसयुपी घराचे आराखयाप्रमाणे प्रमाणे या घराचा आराखडा करण्यासाठी व योजनेची कामे पुर्ण करण्यासाठी कन्सलंट नेमण्यात येईल, बिएसयुपीची कामे संपल्यानंतर ही योजना आपणास सुरु करता येईल.

**उमेशसिंह चव्हाण** शहरातील सर्व व्यवसायधारकांना परवाना शुल्क आकारुन त्यांना व्यवसाय परवाना देण्याचा ठराव पारीत करण्यात आला होता आमची एवढीच विनंती आहे की महानगरपालिकेचे उत्पन्न वाढीसाठी त्वरीत सर्वे करुन सर्व व्यापा-यांना मार्च २०१५ पुर्वी व्यवसाय परवाना देण्याची कार्यवाही करावी.तसेच वीबिएसयुपी योजने अंतर्गत बांधकाम करण्यात आलेल्या घरांना ड्रेनेज कनेक्शन जोडण्यात आलेले नाही त्यामूळे ज्या ज्या घरांना ड्रेनेज लाईन कनेक्शन जोडण्यात आलेले नाही त्यामूळे याचा सव्है करुन कोणाला १५० फुट कोणाला १००-५० फुट पाइप लाईन टाकून द्यावी लागणार आहे.ही कामे संबंधित कंत्राटदाराकडून करुन घेण्यात यावे नसता कंत्राटदार काम सोडून जाईल.

**आयुक्त** बिएसयुपी योजने अंतर्गत संबंधित नागरीकांना ९० फुटापर्यत मलनिस्सारण लाईन टाकून द्यावयाची आहे परंतु त्यापेक्षा जास्त लांबीची ड्रेनेज पाईप लाईन टाकावयाची असल्यास तो खर्च महानगरपालिकेस करावा लागेल.

**संजय मोरे** जेएनएनयूआरएम व बिएसयुपी योजनेतील नागरी सुविधाची(इन्फाची)कामे बाकी आहेत ती पूर्ण करण्यात यावी.

**आयुक्त** जेएनएनयूआरएम योजनेबाबतीत सांगावयाचे आहे की जेएनएनयुआरएम योजने अंतर्गत महानगरपालिकेस आपला वाटा म्हणून १० टक्के टाकावयाचा होता आता केंद्र शासनाने जेएनएनयूआरएम योजना ही अमृतमध्ये रुंपातरीत केल्यामूळे महानगरपालिकेस ३० टक्के वाटा भरण्याचा निर्णय केंद्र शासनाने घेतला होता व तसे आदेशही काढण्यात आले होते परंतु नंतर केंद्र शासनाच्या लक्षात आले की,देशातील ड वर्ग ६७ शहराची आर्थिक परिस्थिती आपल्या महानगपालिकेसारखीच नाजूक आहे त्यामूळे केंद्र शासनाने महानगरपालिकेचा वाटा कमी केलेला आहे. शासनाने लॅण्ड ॲक्वीजेशन न केल्यामूळे ॲडीशनला सेंट्रल असिसंस्टने देशातील ६७ महानगरपालिकेचा जेएनएनयूआरएम योजनेतील १० टक्केचा निधी रोकून ठेवलेला आहे.यामध्ये नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेचा १० निधी म्हणजे ४१ कोटीचा निधी रोकुन ठेवलेला असून तो नागरी सुविधा अंतर्गत वळविलेला आहे. केंद्र शासनाने जेएनएनयुआरएम योजना ही आर्थिक निधिसह बंद अमृत योजना सुरु केलेली आहे. फक्त जेएनएनयुआरएम योजने अतर्गत तरोडा व कौठा या दोन भागात मलनिस्सारण योजनेची रु. १४४ कोटीचे कामाच्या निविदा पुर्वीच निघाल्यामूळे हीदोन्ही कामे या योजने अंतर्गत मार्गी लागतील. जेएनएनयुआरएम पहिल्या टप्प्यात केद्र व राज्य शासनाचा ९० टक्के वाटा, महानगरपालिकेचा वाटा म्हणून १० टक्के वाटा असा रेशिओ होता नंतर केंद्र शासनाने जेएनएनयूआरएम योजना टप्पा क्र. २ मध्ये केंद्र व राज्य शासनाचा ८० टक्के व महानगरपालिकेचा २० टक्के असा रेशिओ केल्यामूळे तरोडा व कौठा या भागातील मलनिस्सारण योजनेतील महानगरपालिकेचा आपला २० टक्के वाटा म्हणजे रु. २०.२० कोटी महानगरपालिकेस भरावा लागणार आहे. जेएनएनयूआरएम योजनेतील मलनिस्सारण कामाचा शिल्लक निधी हिवाळी अधिवेशन संपल्यानंतर महानगरपालिकेस रिलिज होईल. केंद्र शासनाने १४ व्या वित्त आयोगाच्या निधी पोटी पहिला हप्ता रु. १५ कोटी व दुसरा हप्ता रु. १५ कोटीचा निधी दिलेला आहे. १४ व्या वित्त आयोगाच्या निधीतून स्वच्छ भारत अभियांन अंतर्गत टायलेटच्या बांधकामासाठी महानगरपालिकेचे प्रत्येकी रु.५०००/- याप्रमाणे अनुदान देण्यासाठी जवळपास रु. ४.०० कोटी लागतील व साफसफाईच्या कामासाठी लागणारी वाहने व मशिनरीज खरेदी करण्यासाठी रु. २.०० कोटी लागतील उर्वरीत १४ व्या वित्त आयोगाच्या निधीतून महागनरपालिकेचा आपला वाटा म्हणून रु. २०.२० कोटीचा निधी भरण्यात येईल

**विनय गुर्रम** मी ३-४ तक्रारी केलेल्या आहेत परंतू त्या तक्रारीवर प्रशासनाने अद्याप कुठलीच कार्यवाही केलेली नाही. श्री शैलेंद्र जाधव ,अभियंता पाणी पुरवठा यांनी बोगस प्रमाणपत्र देवून अभियंता पदावर बढती मिळविलेली आहे त्याची चौकशी करण्याची मागणी केली आहे. संबंधित अभियंता हे अनेक दिवसापासुन कामावर नाही, प्रशासनामार्फत त्यास लेखी कळविण्यात येते परंतु त्यांवर ते कोणत्याही प्रकारचे उत्तर देत नाही त्यांचे विरुध्द कुठलीही कार्यवाही करण्यात येत नाही.मी चौथ्या महिण्यात तक्रार केलेली आहे ८ महिणे झाली अद्याप त्यावर कार्यवाही झालेली नाही.

**आयुक्त** संबंधित अभियंता हे सेवानिवृत्त जरी झाले तरी पुर्ण चौकशी झाल्याशिवाय त्यांना पेन्शन मंजुर होणार नाही .आपण त्याचे विरुध्द जी काही तक्रार केली ती तुमच्या बाजूने खरी आहे परंतु मानवतेच्या दृष्टीकोनातून त्यांची दुसरी बाजु काय आहे हेही पहावे लागेल. त्यांचे शैक्षणिक अर्हतेचे प्रमाणपत्र बोगस ठरले तर ते निश्चितच रिव्हर्ट होतील. आपण त्यांचेविषयी जी तक्रार केलेली आहे त्याप्रमाणे चौकशी अधिकारी नेमूण त्यांचे मार्फत कारणे दाखवा नोटीस व आरोपपत्र (चार्जशिट) द्यावी लागेल,चौकशी अधिका-यांच्या अहवालानूसार त्यांचे विरुध्द कार्यवाही करावी लागेल. संबंधित अभियंत्यांनी रजा सादर केलेली असून ते रजा वाढवित आहे. त्यांना नियमानूसार शिल्लक रजा घेण्याचा अधिकार आहे.ते सेवानिवृत्त जरी झाले तरी त्यांची पुर्ण चौकशी झाल्याशिवास त्यांची पेंन्शन मंजुर होणार नाही.

**विनय गुर्रम** एटूझेडच्या संदर्भात मी माहिती मागितलेली आहे. यासंदर्भात मी वारंवार स.आयुक्त श्री येवले साहेबांना पत्र दिलेले आहे परंतू मला माहिती का देण्यात येत नाही. माहिती देण्यास एवढा कालावधी का लागत आहे. एटूझेडने वर्षभरात झोनमध्ये केलेल्या कामाची देयके अदा करण्यासाठी जी कागदपत्रे सादर केली जी देयके सादर केलेली आहे त्याच्या सत्याप्रती देण्याची मी मागणी करीत आहे व त्यांना जी बिलाची अदाई करण्यात आलेली आहे ती चुकीच्या पध्दतीने करण्यात आलेंली आहे असे माझे म्हणणे आहे. एटूझेडने कोणकोणती कामे केली उदा.त्यांनी नाल्यातील ६०० ट्रिप गाळ काढला व त्याची देयके सादर केली. त्यांनी ६०० ट्रिप कोणत्या नाल्यातील काढला व तो कुठे टाकला याची लेखी माहिती मिळत नाही. साधी सायकल रिक्षा दुरुस्त केली तर त्यांचे बिल आणावे लागते.याबाबी आयुक्तांचे निदर्शनास न आणता त्यांना चेक कसा काय देण्यात आला. एटूझेडची बिले व्हावचर देण्याची मागणी केली तर ती बिले व्हावचर झोन कार्यालयात असल्याचे सांगण्यात येते.आज देतो उद्या देतो असे सांगण्यात येत आहे. माहिती मिळणार आहे किंवा नाही.

**आयुक्त** आपण पुर्ण संचिकातील पानाची प्रत ,व्हावचर, बिले याची झेरॉक्स प्रत देण्याची मागणी केलेली परंतु या एवढया मोठया कागदपत्राची झेरॉक्स प्रत काढण्यासाठी लागणारा खर्च कोणी द्यावयाचा .स.सदस्य जरी असले तरी ते प्रथम नागरीक आहे त्यानंतर ते स.सदस्य. माहिती अधिकार कायद्यातील कलम ८ नुसार कार्यालयातील सार्वजनिक माहिती (पब्लिक डोमेन) कोणत्याही नागरीकांना विहित अर्ज सादर करुन व शुल्क भरुन माहिती मागण्याचा अधिकार आहे. स.सदस्यांना माहिती पाहिजे असेल तर त्यांनी माहिती अधिकारात नियमाप्रमाणे विहित नमून्यात अर्ज् देवून व संबंधित कागदपत्राच्या झेरॉक्स काढण्यासाठी लागणारा खर्च भरुन घ्यावी.सबंधितांनी विहित कालावधीत माहिती दिली नाही तर माहिती अधिकारात त्यांचे विरुध्द कार्यवाही करण्याचे अधिकार आहेत. सार्वजनिक हितार्थ माहिती पाहिजे असेल तर स.सदस्यांनी संचिकेतील पानाचे फोटो काढून माहिती घेण्यास हरकत नाही.

**विनय गुर्रम** स.आयुक्त श्री येवले साहेबांनी त्याच वेळेस नियमानुसार अर्ज देवून झेरॉक्स काढण्यासाठी लागणारा खर्च भरावा असे सांगितले असते तर मी त्याच वेळी पैसे भरले असते.

**संजय मोरे** महानगरपालिका अधिनियमात स्थायी समितीचे सदस्यांना माहिती पाहिजे असेल तर त्यांना माहिती दाखवावी अशी तरतूद आहे.

**आयुक्त** महानगरपालिका अधिनियमातील कलम सांगावे ,माहिती दाखविणे आणि कागदपत्राची प्रत देणे यामध्ये फरक आहे. कागदपत्राची झेरॉक्स प्रत घ्यावयाची असेल तर माहितीचे अधिकारात अर्ज द्यावा आपणास माहिती देण्यात येईल.

**विनय गुर्रम** मला किती दिवसात माहिती मिळेल.

**आयुक्त** माहिती अधिकारात अर्ज द्या संबंधित संचिकेतील किती पानाची माहिती पाहिजे त्याच्या झेरॉक्स प्रति काढण्यासाठी किती खर्च येतो हे पाहून त्याप्रमाणे खर्च दिल्यानंतर आपणास माहिती देण्यात येईल. नसता आपण सार्वजनिक हितासाठी या माहितीचा वापर करणार असेल तर संबंधित संचिकेतील पानाचा फोटो काढून माहिती घ्यावी.

**उमेश चव्हाण** मागील सभेत शहरातील अभिन्यासातील मोकळया जागेची माहिती देण्याची मागणी करण्यात आली होती

**आयुक्त** सर्व विभाग प्रमुखांना मागील सभेचे इतिवृत्त दिल्यानंतर ते आपल्या विभागाची माहिती देतील. व ठरावाप्रमाणे कार्यवाही करतील.

**अन्नेवार संदिप** मागील सभेत माझ्या प्रभागात अनाधिकृत बांधकाम होत असल्याची तक्रार केली होती त्यावर काय कार्यवाही करण्यात आली,

**उमेशसिंह चव्हाण** मागील सभेत जे काही निर्णय घेण्यात आले त्यावर काय कार्यवाही करण्यात आली त्याची माहिती पुढील सभेत देण्यात यावी.

**सभापती** आयुक्त साहेबांनी प्रायमिनिस्टर हौसिंग फार ऑल या योजनेची सविस्तर माहिती दिली त्यांची नोंद घेण्यात येते.

**ठराव क्रं. १९०** **ठराव**

आयुक्त, नांवामनपा नांदेड यांनी केंद्र शासनाने शहरी भागा करिता घोषीत केलेल्या प्रायमिनिस्टर हौसिंग फार ऑल या योजनेची सविस्तर माहिती सभागृहास दिली त्यांची नोंद हि नांवामनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते घेते.

**सभापती** आजच्या सभेचे कामकाज अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात पार पडले त्याबध्दल मी सर्व स्थायी समितीचे सदस्य, आयुक्त, नांवाशमनपा नांदेड, सर्व अधिकारी व कर्मचारी यांना धन्यवाद देवून आजच्या सभेचे कामकाज संपल्यामूळे आजची सभा संपल्याचे जाहिर करण्यात येते.

**स्वाक्षरीत/-**
**नगरसचिव,**
नांवाशमनपा, नांदेड.

**स्वाक्षरीत/-**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
नांवाशमनपा, नांदेड.